**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 07.09.2025** **वार- रविवार**

---

**<u>मिरवणूक</u>**

पुण्यातले मानाचे आणि प्रतिष्ठीत मंडळांचे गणपतींचे काल वेळेत विसर्जन होऊनही, इतर मंडळांनी ठरलेली वेळ न पाळल्यानं, रेंगाळलेली विसर्जन मिरवणूक थोड्या वेळापूर्वी संपली.

मागच्या वर्षी दुसऱ्या दिवशी अडीच वाजता विसर्जन मिरवणूक संपली होती.

दरम्यान मिरवणुकीत आणि मिरवणुका संपवून परतणाऱ्या मंडळांच्या डीजेच्या दणदणाटामुळे, तसेच ढोल-ताशा पथकांनीही आवाजाची मर्यादा ओलांडल्याचं दिसून आलं.

पुण्यात काल संध्याकाळी साडेसात ते आठच्या दरम्यान बुधवार चौक परिसरात गणेश विसर्जनाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांशी गैरवर्तन झाल्याची घटना घडली. ढोल-ताशा पथकातील काही अनोळखी सदस्यांकडून महिला पत्रकारास ढकलून देणे आणि धमकावणे, तसेच तिच्या सहकाऱ्याला मारल्यानं तो खाली पडून त्यांचा चष्मा तुटण्याची घटना घडली. या संदर्भात अधिकृत फिर्याद दाखल करण्याचे निर्देश पत्रकारांना

देण्यात आले आहेत. तसेच एका ढोल ताशा पथकातील काहीजणांनी वृत्तपत्र छायाचित्रकाराला धक्काबुक्की केल्याची घटनाही घडली आहे.
दरम्यान पोलिसांनी एका कार्यकर्त्याला ताब्यात घेतले आहे. तसेच एका तरुणाकडे कोयता आढळून आला आहे. पोलिस त्याची चौकशी करत आहेत.

**<u>पिंपरी चिंचवड विसर्जन मिरवणूक</u>**

दरवर्षीप्रमाणे यंदाही पिंपरी चिंचवड शहराची विसर्जन मिरवणूक वेळेत आटोपली. काल रात्री ठीक बारा वाजता महापालिकेने स्वागत कक्षाचे काम थांबवले.
शेवटच्या टप्प्यात 30 मंडळांनी महापालिकेकडून सत्कार स्वीकारला. शेवटचा मोरया गोसावी क्रीडांगण मित्रमंडळा गणपती रात्री 11 वाजून 55 मिनिटांनी विसर्जीत झाला .

**<u>निर्माल्याचे संकलन</u>**

गणेश उत्सवादरम्यान स्वच्छच्या 400 हुन अधिक कचरावेचकांनी 50 हून अधिक विसर्जन घाट आणि केंद्रांवर ‘निर्माल्य टू निसर्ग’ हा उपक्रम राबवला. कचरा वेचकांनी नागरिकांकडून 114 टन निर्माल्याचे संकलन करून त्याचं काटेकोरपणे वर्गीकरण करत त्यातून 39 टन सुका कचरा स्वतंत्र केला. संकलित निर्माल्य पुणे महानगरपालिकेकडे खतनिर्मितीसाठी देण्यात आले आहे . कचरावेचकांनी निर्धाराने आपली बांधिलकी जपत, दोन्ही दिवशी रात्री उशीरापर्यंत विसर्जन केंद्रांवर थांबत निर्माल्य संकलनाचे काम सुरू ठेवले.

**<u>मुख्यमंत्री</u>**

आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक यांची आज जयंती आहे. यानिमित्त पुरंदर तालुक्यातल्या देवडी इथल्या क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या स्मारकस्थळी झालेल्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. ब्रिटिशांच्या ईस्ट इंडिया कंपनीला भारतातून पहिला विरोध करणारे राजे उमाजी नाईक होते. या देशामध्ये परकीयांचे राज्य चालू देणार नाही या निर्धाराने ज्याप्रमाणे रामोशी समाजाला राजे उमाजी नाईक यांनी अभिमान दिला आणि स्वाभिमान दिला होता, त्या प्रमाणे या समाजाच्या पाठीशी राज्यसरकार उभा आहे अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली .

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अद्वितीय योगदान देणारे राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**<u>ग्रहण</u>**

दशकातील सर्वात मोठ चंद्र ग्रहण आज घडणार असून हे ग्रहण भारतासह आशिया, ऑस्ट्रेलिया, पूर्व आफ्रिका आणि युरोपच्या काही भागांमध्ये स्पष्टपणे दिसणार आहे. ही खगोलीय घटनापाच तासांपेक्षा जास्त काळ चालणार आहे. रात्री 9 वाजून 57 मिनिटांपासून सुरू होणार ही खग्रास ग्रहण रात्री दीड वाजे पर्यन्त चालेल.

**<u>स्पर्धा</u>**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या वतीन, ग्लोबल गणेश फेस्टिवलअंतर्गत फोटोग्राफी आणि रील्स स्पर्धा 2025 आयोजित करण्यात आली आहे. ग्लोबल गणेश फेस्टिवलअंतर्गत विविध उपक्रम, स्पर्धा आयोजिल्या आहेत. स्पर्धेत विनामूल्य सहभागी होतं येणार असून येत्या 30 सप्टेंबर 2025 पर्यंत या स्पर्धेत फोटो तसंच  रील्स पाठवता येतील. फोटोग्राफी आणि रील्स या दोन्ही प्रकारात तीन क्रमांक काढले जाणार आहेत.

**आशा**

सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या पूना गेस्ट हाऊस स्नेह मंचतर्फे 'अतुलनिय आशा' हा सांगितीक आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून सायंकाळी 5 वाजता पूना गेस्ट हाऊस, लक्ष्मी रस्ता इथं होणार आहे.

**गौरव**

आडकर फौंडेशनतर्फे विधिज्ञ भास्करराव आव्हाड स्मृती पुरस्कार शिक्षणतज्ज्ञ, डॉ. संजय चोरडिया यांचा गौरव केला जाणार आहे. पुरस्कार वितरण उद्या सकाळी 11 वाजता महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात होणार असून महाराष्ट्र- गोवा बार कौन्सिलचे सदस्य विधिज्ञ अविनाश आव्हाड यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज संध्याकाळी पावसाच्या मध्यम सरी पडल्या. उद्या पावसाच्या हलक्या सरी पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता,  ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**